महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई
ईमेलः maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट : www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/नीटयुजी-२०१८/सूचना क्र.३८/१४९९/२०१८ दिनांकः- २७.१०.२०१८

# नीट युजी - २०१८

## उमेदवारांसाठी व महाविद्यालयांसाठी अतिमहत्वाची सूचना

संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेकरीता अर्ज करण्याची सुरुवात दिनांक २७/१०/२०१८ पासून सुरु झाली आहे. परंतू राज्य सीईटी कक्षाकडे काही उमेदवारांनी ईमेलव्दारे/दुरध्वनीव्दारे विचारणा केली असल्यामुळे विद्यार्थी/पालक व महाविद्यालयांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

१) राज्य सीईटी कक्ष व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली संस्थास्तरावरील प्रवेश फेरीबाबतची सूचना ही BAMS/BHMS/BUMS/BPTH/BOTH/BASLP/BP&O या सर्व अभ्यासक्रमांकरीता एकत्रित असल्यामूळे जी पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे ती सर्व अभ्यासक्रमाची एकत्रित यादी आहे. विद्यार्थ्यांनी त्या त्या अभ्यासक्रमाच्या पात्रतेचे निकष बघुनच संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेकरीता महाविद्यालयात अर्ज करावेत.

२) ज्या उमेदवारांनी NEET UG - 2018 ही सामाईक प्रवेश परीक्षा दिली आहे व ज्यांना आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी या अभ्यासक्रमासाठी संस्थास्तरावरील प्रवेशाकरीता अर्ज करण्यासाठी ईच्छुक आहेत अशा सर्व उमेदवारांना गुणांची पात्रता खुल्या संवर्गाकरीता ५० Percentile (११९) किंवा त्यापेक्षा जास्त गुण आहेत व राखीव संवर्गातील उमेदवारांस ४० Percentile (९६) किंवा त्यापेक्षा जास्त गुण आहेत असेच उमेदवार आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी या अभ्यासक्रमाला अर्ज करु शकतात.

३) ज्या महाविद्यालयांनी अपात्र उमेदवारांचे अर्ज स्विकृत केले असतील अशा सर्व उमेदवारांची नावे अपात्रतेच्या यादीत समाविष्ठ करुन तसेच अपात्रतेचे कारण नमुद करुन उमेदवारांना तसे कळविण्यात यावे.

सही/-
(ए.ई.रायते) भा.प्र.से.
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,
राज्य सीईटी कक्ष, महाराष्ट्र राज्य
मुंबई